# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रेसनोट**

**दि. ६,मार्च,२०२४.भाईंदर (प.)**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कला-क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ मा. अति. आयुक्त श्री. संभाजी पानपट्टे यांच्या हस्ते संपन्न.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका प्रशासनामार्फत, मिरा भाईंदर पालिकेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर प. येथे करण्यात आले. या कला क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मा. अति. आयुक्त श्री. संभाजी पानपट्टे यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आले. या उद्घाटनाप्रसंगी मा. उपायुक्त श्रीम. कल्पिता पिंपळे, समाजकल्याण अधिकारी दिपाली पोवार, सहा. आयुक्त चंद्रकांत बोरसे, सहा. आयुक्त जितेंद्र कांबळे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे समाजकल्याण विभागाचे कर्मचारी वर्ग, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

शरिरीक विकास होण्यासाठी मैदानी खेळ खेळणे अत्यंत महत्त्वाचे असुन आजच्या तांत्रिक युगात मुलांच्या मैदानी खेळांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. असे सांगुन उपस्थितांना मैदानी खेळाचे महत्तव महापालिकेचे अति. आयुक्त संभाजी पानपट्टे यांनी पटवून दिले. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मार्गदर्शनाखील मनपा शाळेतील उभारत्या खेळाडुंना उत्तम व दर्जेदार सेवा सुविधांबरोबर प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासह इतर आवश्यक बाबी पुरवण्यासाठी महानगरपालिका प्रशासन तयार असल्याचे या कला क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मा. अति. आयुक्त यांनी सांगितले.

या कला क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात दिप प्रज्वलनानंतर मैदानात मशाल ज्योत फिरवून विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत करण्यात आला. या कला क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ २०० मी. धावण्याच्या स्पर्धेने करण्यात आले. दि. ६ मार्च व ७ मार्च असा दोन दिवस हा कला क्रीडा महोत्सव या मैदानात साजरा होणार आहे. ॲथलॅटीक्स, कबड्डी, खो-खो, लंगडी आणि लगोरी सारखे खेळ यात खेळले जाणार असुन विजेते विद्यार्थ्यांना परितोषकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

या कला क्रीडा महोत्सवाचे नियोजन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच मनपा शाळेचे क्रीडा शिक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहाय्याने करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner